India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY
केवळ खाजगी वितरणाकरिता

आमच्या वाचकांना हे नूतन वर्ष प्रगतीचे जावो. एकोज इंडिया एका नव्या स्वरुपात आपल्यासमोर सादर होत आहे, संपूर्ण जगभर हे स्वरुप आता एकसारखेच असेल. एकोज इंडिया वार्तापत्राचे हे नवीन स्वरुप आपल्याला आवडेल याची आम्हाला खात्री आहे.

या अंकाची अनुक्रमणिका :

गुरुदेवांचा प्रवास . . . . . पृष्ठ १–४
घोषणा . . . . . पृष्ठ ५
विभागीय कार्यक्रम . . . . . पृष्ठ ६–१०
प्रकाशाची केंद्रे. . . . . पृष्ठ ११

गुरुदेवांचा प्रवास

दक्षिण तामिळनाडूतील त्रिचीपासून ४५ कि.मी. अंतरावर थुराइयुर हे एक छोटे गाव आहे. २००१ मध्ये केवळ दोन अभ्यासी असणाऱ्या या ठिकाणी आजमितीला सुमारे १५० अभ्यासी आहेत. अभ्यासींच्या संख्येतील वृद्धीमुळे या ठिकाणी आश्रम उभारावा असे ठरले व एक एकर जमिन खरेदी करण्यात आली.

२५ ऑक्टोबर रोजी पू. गुरुदेवांनी या केंद्राला दिलेल्या प्रथम भेटीच्या वेळी अभ्यासींना दिव्य आनंदाची अनुभूती झाली. सुमारे साडे–आठशे अभ्यासींकरिता सत्संगाचे संचालन केल्यानंतर गुरुदेवांनी त्यांना तमिळ भाषेत संबोधित केले. आपल्या भाषणात जाति–व्यवस्था, पंथ व कर्मकांडे यातून बाहेर पडून स्वत:मध्ये अंतर्गत बदल घडवून आणणे आणि तो बदल आपल्या बाह्य कृतींमध्ये प्रतिबिंबीत करणे यावर त्यांनी भर दिला. इतरांना आपल्या मिशनकडे आकृष्ट करण्याचा हाच एक मार्ग आहे असे ते म्हणाले.

आश्रमाच्या बांधकामाला सुरुवात होण्याआधी त्याच्या भविष्यकाळातील वृद्धिबद्दल गुरुदेवांनी चर्चा केली. सामान्य माणसांचे विचार केवळ वर्तमानकाळापुरते मर्यादित असताना गुरुदेवांची दृष्टी भविष्यकाळाचा वेध घेत असते. भविष्याचा पाया ते वर्तमानकाळात घालत असतात.

सिलीगुडी व गंगटोक

दिनांक २ नोव्हेंबर रोजी कलकत्ता ते बागडोगरा अशा विमानप्रवासानंतर तेथील अभ्यासींच्या मोठ्या समुदायाने गुरुदेवांचे मन:पूर्वक स्वागत केले. विमानतळापासून तासाभराच्या अंतरावर असणाऱ्या मिशनच्या जागेला भेट देण्याकरिता ते रवाना झाले. सिलिगुडी येथील एका हॉटेलच्या (कॉन्फरन्स) परिषद–कक्षामध्ये सायंकाळी साडेपाच वाजता त्यांनी सत्संगाचे संचालन केले.

दुसऱ्या दिवशी सकाळचा सत्संग सात वाजता होणार होता, परंतु साडेसहा वाजल्यापासून गुरुदेव स्वत: ध्यानकक्षात उपस्थित राहून अभ्यासींची वाट पहात होते. सकाळी ९ वाजता तीस्ता नदीच्या काठावरील निसर्गरम्य प्रदेशातून गुरुदेव सिलीगुडीहुन गंगटोक (सिक्किम) येथे जाण्याकरिता निघाले. ते दुपारच्या सुमारास सिक्किमच्या सीमेवर पोहोचले व रांगपो येथील शासकीय विश्रामगृहात काही काळ थांबले. त्याप्रसंगी पारंपारिक पद्धतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. तासाभराच्या प्रवासानंतर निसर्गसौंदर्याने नटलेल्या रिसॉर्टमध्ये पोहोचल्यावर तेथील पारंपारिक वास्तुरचनेची त्यांनी प्रशंसा केली. स्थानिक अभ्यासींनी केलेल्या सत्कारानंतर गुरुदेवांनी मोकळ्या अंगणात बसून सूर्यप्रकाशाचा आनंद घेतला. सिक्किममध्ये येऊन मला फार आनंद होत आहे असे गुरुदेव अनेकदा म्हणाले.

गुरुदेवांशी बातचीत करताना कोणीतरी म्हणाले की लोक सहज मार्गात येतात, पण लवकरच सोडून जातात. यावर गुरुदेव म्हणाले, "लोक येतील व जातील, पण एकदा ते येथे आले, की ते कुठे जातात याचा मागोवा घेणे हे माझी जबाबदारी आहे."

संध्याकाळच्या सत्संगाच्या वेळी गुरुदेवांनी सर्वांना विचारले, "आपण सर्व तयार आहात ना?" या प्रश्नाने गुरुदेवांच्या सिक्किममधील मुक्कामाचा पायंडा पडला. रात्रीच्या जेवणाच्या वेळी त्यांनी पूज्य बाबूजींबद्दलचे काही किस्से उपस्थितांना कथन केले.

चौथ्या दिवशीची सुरुवात सकाळी सातच्या सत्संगाने झाली. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमानंतर जेवण व शेकोटीच्या कार्यक्रमात गुरुदेव स्वत: सामील झाले. त्यांनी यावेळी काही पौराणिक गोष्टीही सांगितल्या.

सिलीगुडी

रंगपो

गंगटोक

मेजवानीचे आयोजन केल्याबद्दल सिक्कीम येथील अभ्यासींना धन्यवाद देताना गुरुदेवांनी श्री राम व नावाडी यांची एक कथा सांगितली. "ज्या प्रकारे तुम्ही आमच्या शरीरासाठी अन्न पुरवले आहे त्याचप्रमाणे तुमच्या आत्म्यांकरीताही अन्नाचा पुरवठा होवो अशी मी प्रार्थना करतो" असे ते या प्रसंगी म्हणाले.

५ नोव्हेंबर रोजी स्थानिक बाजारात जाऊन 'क्रेस्ट'च्या वाचनालयासाठी गुरुदेवांनी काही पुस्तके विकत घेतली. स्थानिक प्रशिक्षकाच्या निवासस्थानी त्यांनी सत्संगाचे संचालन केले व अभ्यासींबरोबर काही काळ व्यतीत केला. तो एक प्रसन्न दिवस होता. उपस्थितांपैकी प्रत्येक जण अत्यंत आनंदी होता व गुरुदेवांच्या कृपावर्षावात चिंब भिजलेला होता.

संध्याकाळच्या सत्संगानंतर 'सर्व मनुष्यजात एक असून लोकांमध्ये भेदभाव असू नयेत' या विषयावर भर देऊन गुरुदेवांनी उपस्थितांशी संवाद साधला. आध्यात्मिकतेमध्ये भेदभावाला थारा नाही. 'सत्य' हे एकमेव, अद्वितीय असून तेच सर्व जीवांमधील मूलतत्व आहे, असे ते म्हणाले.

६ नोव्हेंबर रोजी गुरुदेवांनी सिक्कीममधून प्रयाण केले. सिलिगुडी येथे पोहोचल्यावर आश्रमाच्या जागेत तळपत्या उन्हात सत्संगाचे संचालन केले व उपस्थितांना प्रसाद वाटला. दुपारच्या जेवणानंतर त्यांनी कलकत्त्याला प्रयाण केले.

ओरिसा

खरगपूर ते भुवनेश्वर हा ३५० कि.मी. चा प्रवास १५ नोव्हेंबर रोजी गुरुदेवांनी मोटारीने केला. दुपारी ११ च्या सुमारास त्यांचा ताफा भद्रक या ओरिसातील एका लहान केंद्रात पोहोचला. तेथील अभ्यासींच्या भेटी घेऊन व तेथेच दुपारचे भोजन करून गुरुदेव भुवनेश्वरसाठी रवाना झाले.

दुपारी ४.४५ वाजता भुवनेश्वर येथील हॉटेलवर जेव्हा गुरुदेव पोहोचले, तेव्हा मुसळधार पावसातही अभ्यासी त्यांच्या स्वागताकरिता हजर होते. भुवनेश्वरला गुरुदेवांची ही पहिलीच भेट असून ओरिसा राज्याला गेल्या बावीस वर्षातील दुसरी भेट होती. यापूर्वी त्यांनी कटक व अंगुल या ठिकाणी भेट दिली होती.

१६ नोव्हेंबर रोजी ओरिसामधील पहिल्याच आश्रमाच्या जागेला भेट देण्यासाठी गुरुदेव निघाले. ३५० अभ्यासींच्या समुदायाने त्यांचे भव्य स्वागत केले. सत्संगानंतरच्या आपल्या भाषणात गुरुदेव म्हणाले " 'शंका' हे आपल्या आत्म्याकरिता विष आहे. काही गोष्टी अशा असतात ज्यामध्ये शंका घेण्यास परवानगी नसते. जसे की परमेश्वराचे अस्तित्व. पू. बाबूजींनी वर्तमान अभ्यासींकरिता तसेच भविष्यातील अभ्यासींकरिता पुष्कळ मोकळीक दिलेली आहे. ते म्हणतात की पद्धतीला तपासा, आपल्या होणाऱ्या गुरुची नीट पारख करा आणि जेव्हा आपली संपूर्ण खात्री पटेल की आपण योग्य गुरुपाशी येऊन पोचलेलो आहोत, तेव्हा मजबूत पोलादी बंधांनी स्वत:ला गुरुशी बध्द करा जेणेकरुन मुर्खपणे आपण त्यांच्यापासून वेगळे होणार नाही."

१८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३५ वाजता गुरुदेवांनी ध्यानकक्षात प्रवेश केला.

'विस्पर्स खंड १ व २' मधील पूज्य बाबूजी महाराजांच्या संदेशांबद्दल गुरुदेव म्हणाले, " या संदेशांना 'श्रुति' असे म्हणता येईल कारण कोणाच्या विचारातून त्या निर्माण झालेल्या नाहीत, कोणी त्यांना लिहिलेले वा टंकलिखित केलेले नाही. त्या प्राप्त झाल्या व त्यांना लिहिले गेले. त्यामुळे त्यांची महानता लक्षपूर्वक जाणून घेणे आवश्यक आहे. आत्म्याचे स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य हे आपण सतत ध्यानात ठेवले पाहिजे. हे पूर्वीही सत्य होते, आजही सत्य आहे व भविष्यातही सत्यच असेल. रक्तामांसाच्या या शरीरामध्ये हा आत्मा दुर्दैवाने बंदी झालेला आहे, त्यापासून त्याने स्वातंत्र्य मिळवले पाहिजे."

यानंतर गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व अभ्यासींसमवेत काही काळ व्यतीत करतांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. दुसऱ्या दिवशी ते विमानाने चेन्नई येथे जाण्यासाठी निघाले.

बंगलोर

दि. २८ नोव्हेंबर रोजी नाश्ता केल्यानंतर सकाळी ८.३० वाजता गुरुदेवांनी चेन्नई येथून प्रयाण केले व ११.४५ च्या सुमारास ते नतरामपल्ली आश्रमात पोहोचले. सुमारे ८०० अभ्यासींकरिता सत्संगाचे संचालन केल्यानंतर दुपारी १.३० वाजता तेथून निघून ४.३० च्या सुमारास परमधाम आश्रम, बंगलोर येथे त्यांचे आगमन झाले.

रविवारी सकाळच्या सत्संगाआधी 'व्हिस्पर्स फ्रॉम दि ब्राईटर वर्ल्ड खंड तिसरा' याची नोंदणी सुरू करण्यात आल्याची घोषणा गुरुदेवांनी केली. व्हिस्पर्सचे एकूण बारा खंड असतील व दरवर्षी एका खंडाचे प्रकाशन केले जाईल असे त्यांनी सांगितले.

गुरुवार, दि. ३ डिसेंबर रोजी गुरुदेव 'क्रेस्ट' येथे गेले व ' साधना' कार्यक्रमात सहभागी झालेल्या सुमारे ४० प्रतिनिधींनी त्यांचे स्वागत केले. सायंकाळी गोल्फ-कार्ट मधून क्रेस्टच्या परिसरात फेर-फटका मारणाऱ्या गुरुदेवांना पाहून उपस्थितांना सुखद आश्चर्य वाटले.

दि. ४ डिसेंबर रोजी गुरुदेव 'साधना' कार्यक्रमाच्या निरोपसत्रात उपस्थित होते व त्यांनी प्रशिक्षणार्थींना प्रशस्तिपत्रके वाटली. या प्रसंगी प्रशिक्षण

सिलीगुडी

भुवनेश्वर

बंगलोर

तिपतूर

कार्यक्रमाबद्दल व गुरुदेवांच्या उपस्थितीबद्दल आनंद व्यक्त करणारी भाषणे सहभागी अभ्यासींनी केली, जी त्यांनी शांतपणे ऐकली या वेळी केलेल्या भाषणात ते म्हणाले, "सिद्धांत–आचरण, सिद्धांत–आचरण हे पायरी–पायरीने एखादी शिडी चढण्याप्रमाणे आहे. ज्या व्यक्ती याचा स्वीकार करण्यास तयार आहेत, त्यांच्याकरिता माहितीपर, शैक्षणिक व प्रशिक्षणात्मक शक्यतांच्या सुविधा क्रेस्ट येथे उपलब्ध आहेत. पण केवळ स्वीकार पुरेसा नाही. इथे जे शिकवले जाते ते आचरणात आणण्याची त्यांची तयारी आहे का?"

शनिवार, दि. ५ डिसेंबर रोजी गुरुदेवांनी कर्नाटकातील प्रशिक्षकांच्या कार्यशाळेचे उद्घाटन केले आणि त्यांना हृदयाद्वारे कार्य करण्याची कळकळीची विनंती केली. या कार्यक्रमासाठी परदेशातून आलेल्या तसेच स्थानिक अशा १४५ प्रशिक्षकांची उपस्थिती होती.

तुमकूर

तिपतूर

रविवार दि. ६ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता पूज्य गुरुदेवांनी तिपतूर येथे जाण्याकरिता प्रस्थान केले. बंगलोरच्या वायव्येला १६० कि.मी. अंतरावर असणाऱ्या या केंद्रात जवळ–जवळ ९० अभ्यासी आहेत. या केंद्राला गुरुदेवांची ही तिसरी भेट होती व ध्यान–कक्ष व बांधकामाच्या पूर्ततेनंतर दिलेली पहिलीच भेट होती. सायंकाळी ५ व ९ वाजता सत्संग होतील अशी घोषणा त्यांनी तेथे पोहोचल्यावर केली व स्वत: दोन्ही सत्संगांचे संचालन केले. जवळपासच्या केंद्रांवरुन तसेच बंगलोरहून आलेले सुमारे १००० अभ्यासी गुरुदेवांच्या दर्शनासाठी उपस्थित होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी पू. गुरुदेवांनी समारोहातील अंतिम सत्संगाचे संचालन केले व तुमकूर येथे निघण्यापूर्वी काही काळ विश्रांती घेतली. अत्यंत उत्सुकतेने तुमकूर येथील अभ्यासी गुरुदेवांची वाट पहात होते. तुमकूर येथील मुक्कामात गुरुदेव प्रसन्न मनस्थितीत होते व पूज्य बाबूजींविषयी व महाभारतातील प्रसंगांविषयी त्यांनी उपस्थितांशी बराच वेळ संवाद साधला. ते म्हणाले, " आपल्याला अंधार कधी दिसतो? आपण स्वत: अंधारात असतो, तेव्हा. यातून सुटका कशी करावी? बाहेर येऊन."

दुपारच्या जेवणानंतर तुमकूर येथून निघून पूज्य गुरुदेव ४.३० च्या सुमाराला बंगलोर येथे पोहोचले. कॉफी–पानानंतर ते लगेच परमधाम आश्रम येथे सत्संग संचालित करण्यासाठी निघाले. अत्यंत धावपळीचा व दगदगीचा दिवस असूनसुद्धा ते रात्री उशिरापर्यंत काम करीत होते. विश्रांती घेण्याकरिता बंगलोर येथील मुक्काम त्यांनी एका दिवसाने वाढवला.

तिरुप्पूर

तिरुपूर

दि. ९ डिसेंबर रोजी सकाळी सव्वा–सहा वाजता बंगलोरहून निघून गुरुदेव साडे–सात वाजता कृष्णगिरी येथे पोहोचले. नाश्त्यानंतर ९ वाजता सत्संग झाला. ईरोड येथे दुपारचे भोजन व थोडी विश्रांती घेऊन डायमंड जुबिली पार्क, तिरुपूर येथे त्यांचे आगमन झाले. दुपारची कॉफी झाल्यावर ते म्हणाले की बाबूजी म्हणत आहेत की आता तुझे कॉफी–पान झाले आहे तु आता कामाला सुरुवात करु शकतोस. लगेचच ते ध्यान–कक्षाच्या दिशेने निघाले व त्यांनी सव्वा–सहाच्या सत्संगाचे संचालन केले. रोज सकाळी साडे–सहा, अकरा व संध्याकाळी साडे–पाच असे तीन सत्संग होतील असे गुरुदेवांनी या वेळी जाहीर केले.

केरळ व तामिळनाडूतील सुमारे ४००० अभ्यासी तसेच गुजरातमधील प्रशिक्षक तिरुपूर येथे हजर होते. यावेळी वातावरण भंडाऱ्याप्रमाणे भारलेले होते. तीनही सत्संगांचे संचालन गुरुदेवांनी स्वत: केले.

दि. ११ रोजी पू. गुरुदेवांनी ध्यानकक्षामध्ये सकाळी ६.३० व ११ वाजताच्या सत्संगाचे संचालन केले. दुपारी ते शहरातील एका अभ्यासीच्या घरी गेले होते व संध्याकाळी ५.३० वा. सत्संगापूर्वी ते वेळेत परतसुद्धा आले.

मलमपूझा

कोईम्बतूर

दि. १२ रोजी गुरुदेवांनी ध्यान कक्षामध्ये तिनही सत्संगांचे संचालन केले. दि. १३ रोजी गुरुदेवांनी सकाळी ६:३० वा. सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर कोईम्बतुर आश्रमाकडे प्रस्थान केले आणि तेथे ११ वा. पोहोचले. गुरुदेवांनी काही काळ विश्रांती घेतल्यानंतर सगळ्या अभ्यासींसमवेत थोडा वेळ व्यतित केला व तद्नंतर त्यांनी मलमपुझाला प्रस्थान केले.

दि. १४ रोजी मलमपुझाला थोडी विश्रांती घेऊन गुरुदेव दुपारच्या जेवणानंतर कोईम्बतुरला परतण्यास निघाले आणि एका अभ्यासीच्या घरी दुपारी ३:०० वा. पोहोचले. रात्रीच्या जेवणाआधी आणि जेवणानंतर गुरुदेव बाहेर येऊन बसले होते त्यामुळे सर्व अभ्यासींना त्यांच्यासमवेत एक छानसे सत्र अनुभवता आले.

दि. १५ रोजी, रात्रीच्या जेवणाआधी गुरुदेव त्यांच्या खोलीत बसुन अनौपचारीकरित्या विविध विषयांवर बोलत होते. त्यामध्ये हिंदु तत्वज्ञानाचे आधारस्तंभ असलेले वेद, ब्रम्हसुत्र आणि गीता; आयुर्वेद; युगं आणि वेळेची संकल्पना अशा विविध विषयांचा समावेश होता. त्यांचा आवडीचा विषय असलेल्या काल्पनिक विज्ञान, आइंस्टाईनचे प्रयोग आणि आइज़िक आज़िमोव लिखित 'फ़ाउंडेशन' मालिकेवर देखील बोलले. ह्या सत्रामधील काही ठळक मुद्दे पुढिलप्रमाणे होते:

गुरुदेवांनी स्पष्ट केले की विचारांना स्वत:ची शक्ती नसते, पण ते शक्तीच्या स्त्रोतांना सक्रिय करु शकतात. त्यांनी प्रार्थनेद्वारे निर्माण झालेली शक्ति उपयोगात आणणे आणि स्वत:ची शक्ती उपयोगात आणणे यांमधील फरक स्पष्ट करुन सांगितला.

प्रकाशाला प्रवास करायला वेळ लागतो. उदाहरणार्थ सूर्यप्रकाशाला पृथ्वीवर पोहोचायला ८ मिनिटे लागतात, म्हणुनच आपण आपल्या डोळ्यांनी जे पाहतो ते नेहमीच भुतकाळातले असते आणि कधीच "आता"चे नसते.

हे एक चांगले सत्र होते जे खोलीतील सगळ्यांना चेतनेच्या एका वेगळ्याच स्तरावर घेऊन गेले. दि. १६ रोजी दुपारी ४:३० वा. गुरुदेवांनी चेन्नईसाठी प्रस्थान केले.

चेन्नई

चेन्नईला परत आल्यानंतर गुरुदेव विविध प्रशासकीय कामांमध्ये खप व्यस्त झाले. जगातील वेगवेगळ्या भागातून जवळ जवळ २०० अभ्यासी मणपक्कमला नाताळची सुट्टी घालवण्यासाठी आले होते.

दि. २४ डिसेंबर रोजी सायंकाळी गुरुदेवांनी नाताळाचा केक कापला. अभ्यासींनी यावेळी नाताळसणाच्या वेळी गाईली जाणारी गाणी गाईली. यावेळी कोणीतरी उद्गारले की "गुरुदेवांबरोबर असताना जणूकाही येशु ख्रिस्तांबरोबरच असल्यासारखे वाटते." ह्या उदगारावर गुरुदेव प्रेमाने हसले. एका उत्सवाचे वातावरण आश्रमामध्ये पसरले होते.

दि. ३१ डिसेंबर रोजी गुरुदेवांनी २ आठवड्यांपासुन भारतात आलेल्या स्कॉलर्स बरोबर काही वेळ घालवला. ते सगळे अभ्यासी दोन आठवडे खरगपूरला राहिल्यानंतर प्रशिक्षण कार्यक्रमातील दुसऱ्या टप्प्यासाठी चेन्नईला आले होते.

दि. १ जानेवारी रोजी सकाळी गुरुदेवांनी सत्संग घेवुन नविन वर्षाच्या आगमनाची घोषणा केली. सत्संग झाल्यानंतर बंधु कमलेश पटेल यांनी एका डिव्हिडी संचाचे वितरण केले ज्यामध्ये गुरुदेवांनी अलीकडे दिलेली भाषणे आहेत.

नवीन वर्षासाठी दिलेल्या भाषणामध्ये गुरुदेव म्हणाले, "तर, प्रिय भगिनी आणि बंधूंनो: आपण आपल्या हृदयाच्या हाकेकडे आता जास्त लक्ष दिले पाहिजे, ती आतील आवाजाची हाक आहे. गरज पडली तर, बाह्य जगासाठी कान बंद करा. डोळे बंद करा, ऐकू नका. आपल्याला इश्वराने दिलेल्या पाच इंद्रियांच्या माध्यमातून आपले लक्ष बाहेरुन आत वळविले पाहिजे.

असे न वळविल्यास, अध्यात्म केवळ एक विषय बनून राहतो, ज्याच्याबद्दल आपण बोलतो, चर्चा करतो, ज्याचे प्रशिक्षण घेतो, पण त्याच्याकडे लक्ष देत नाही आणि म्हणूनच आपण जिथल्या तिथेच राहतो."

दि. ४ आणि ८ जानेवारी रोजी गुरुदेवांनी बरीच लग्ने लावली. दि. १५ जानेवारी रोजी गुरुदेवांनी दिल्ली मार्गे सतखोलला जाण्याचे ठरविले आहे.

नाताळ

स्कॉलर्स समवेत

चेन्नई येथे नववर्षदिनी

सदस्यत्वाचे नवीन दर

वार्षिक वर्गणी

- कृपया आपली वार्षिक वर्गणी पुढील पत्त्यावर पाठवावी – "स्पिरिच्युअल हायरार्की पब्लिकेशन ट्रस्ट, ॲडमिन बिल्डींग, बी.एम.ए., एस. आर. सी. एम., मणपक्कम, चेन्नई, ६००११६.
- एप्रिलच्या अंकाने वार्षिक वर्गणीची सुरुवात होईल व आर्थिक वर्षानुसार जानेवारीचा अंक शेवटचा असेल.

नियतकालिक:

- कॉन्स्टंट रिमेम्बरन्स — रु. ३००/–
- त्रैमासिक प्रकाशने – हिन्दी / तामिळ / तेलगु / कन्नड / गुजराती / मल्याळम / बंगाली — रु. १००/–

आजीवन सदस्यता

सदस्यता अर्ज व एस.एच.पी.टी. डोनेशन फॉर्म वर्गणीच्या रकमेसह कार्यकारी विश्वस्त, स्पिरिच्युअल हायरार्की पब्लिकेशन ट्रस्ट 'डिव्हाईन ब्लिस', नॉर्थ ब्लॉक ७ ए, २/३, जजेस कोर्ट रोड, कोलकाता ७०००२७ (पश्चिम बंगाल) भारत यांच्याकडे पाठवावेत.

पुस्तके व ए.व्ही. साठीची आजीवन सदस्यता शुल्क

इंग्लिश	रु. ६,०००/–
हिन्दी	रु. ४,५००/–
मराठी / तामिळ / तेलगु / कन्नड / गुजराती / मल्याळम	रु. ३,०००/–
ऑडियो–व्हिडीयो	रु. २५,०००/–

नियतकालिकांसाठीचे आजीवन सदस्यता शुल्क

कॉन्स्टंट रिमेम्बरन्स	रु. ३,०००/–
हिन्दी सहजमार्ग	रु. २,०००/–
त्रैमासिक प्रकाशने	
तामिळ / तेलगु / कन्नड / गुजराती / मल्याळम	रु. १,५००/–

नविन प्रकाशने



कॉन्स्टंट रिमेम्बरन्स
जानेवारी २०१०

सत्योदयम
(पुन:प्रकाशन) तामिळ



व्यक्तित्वाचे प्रकटन
इंग्रजी



"हियर ॲन्ड नाऊ"
डि.व्हि.डी. संच

भूतकाळाचे पुनरावलोकन

आपल्या मिशनच्या साहित्य व नियतकालिकांमध्ये पू. लालाजी महाराजांपासून उपलब्ध असलेल्या घटना व पू. गुरुदेवांची उद्धरणे यांची एक झलक या नवीन विभागाद्वारे आम्ही आपल्यासाठी घेऊन येत आहोत. या अंकामध्ये आम्ही सन १९५० अगोदरचा म्हणजे सुमारे ६० वर्षापूर्वीच्या काळावर लक्ष केंद्रित केले आहे. ह्या विभाग वाचण्याचा आनंद आपण घ्याल अशी आशा आहे.



लालाजी आपल्या अनेक सहकाऱ्यांना भेटण्यासाठी अनेक ठिकाणी प्रवास करित असत. अनेक 'साधक' देखिल त्यांच्या घरी येऊन रहात असत. अभ्यासींना लिहीलेल्या पत्रांमध्ये वृंदावन, ईटाह, कानपूर, मैनपूरी, ओराई या काही गावांचा उल्लेख आढळतो.

त्यांच्या लिखाणातून व पत्रांमधून निवडलेले काही अनमोल मोती सादर करीत आहोत.

डिसेंबर १९२९

लालाजींचे बाबूजींना पत्र: "होणारे क्लेश हे आपल्या भल्यासाठीच असतात. घर हे संयम व विनम्रता यांची शाळा आहे. एकाप्रकारे विचार केला तर, अश्या गोष्टींमध्ये सहनशीलता ही प्रायश्चित्तच मानावयास हवी आणि ही इतर अनेक प्रायश्चित्तांमध्ये वरच्या दर्जाची मानावयास हवी. तर दु:ख व संताप करण्याऐवजी आपणांस 'गैरत' (आपण अपराधी नसतांना, आपण अपराधी आहोत अशी भावना) वाटली पाहिजे.

एप्रिल १९३०

लालाजी महाराजांचे आणखी एक पत्र: "बहुतांश लोक पूजा एका उपचाराप्रमाणे करित असतात. पण त्यामध्ये खरोखरीची आर्तता, तीव्र तडप व अस्वस्थतेचा अभाव असतो नाहीतर त्यांना त्यांच्या अवस्थेची व त्यांना रोज प्रदान करण्यात येणाऱ्या नवजीवनाची सहज जाणीव होईल."

संग्रहित: ऑटोबायोग्राफी ऑफ रामचंद्र भाग १ (१८९९–१९३२) / कंप्लीट वर्क्स ऑफ रामचंद्र भाग ३.



आश्रमातील घडामोडी

लखनऊ आश्रम – ध्यान कक्ष.

लखनऊच्या आय.आय.एम. रस्त्यावरील बाबूजी मेमोरियल आश्रमातील ध्यानकक्षाचे बांधकाम सुरु झाले आहे. या प्रस्तावित ध्यानकक्षाचा आकार ३०मी. X ४८ मी. एवढा आहे व त्यात ३००० अभ्यासी सामावू शकतील. हा कक्ष पोलादी सांगाडा वापरुन बांधण्यात येणार आहे.

दि. ११ नोव्हेंबर २००९ रोजी, एस.आर.सी.एम. चे चिटणीस, बंधू उमा शंकर यांच्या हस्ते या बांधकामाची पायाभरणी झाली. साधारणत: मार्च २०१० अखेर हे बांधकाम पूर्ण होण्याची शक्यता आहे.

वाराणसी

दि. २ नोव्हेंबर २००९ रोजी, बंधु उमा शंकर यांच्या हस्ते सारनाथ, वाराणसी येथील लययोग आश्रमातील ध्यान कक्षाच्या बांधकामास सुरुवात झाली. दि. १६ फेब्रुवारी २००६ रोजी पू. गुरुदेवांनी या ध्यानकक्षाची पायाभरणी केली होती.

या ध्यानकक्षाचा आकार अष्टकोनी असून त्याचे क्षेत्रफळ जवळ जवळ ८००० चौ. फूट एवढे आहे. आठही खांबांसाठीचा पाया खोदण्याचे काम एक दिवसांत पूर्ण केले गेले व आता आठही खांबांची भरणीदेखील केली गेली आहे.

चिरक्करा, कोलम, केरळ.

नुकत्याच तिरुप्पूरला दिलेल्या भेटीच्या वेळी, गुरुदेवांनी चिरक्करा, कोलम येथील आश्रमाचे 'तपोवन' असे नामकरण केले. दि. २ फेब्रुवारी २००८ रोजी हा आश्रम सर्वांसाठी खुला करण्यात आला. कोलम आणि जवळपासच्या तिरूवनंथपुरम, पथनमथित्ता, अलपूझ्झा या केंद्रांमधून अनेक अभ्यासी येथे येतात 'तपोवन' आश्रम हा राष्ट्रीय राजमार्ग ४७ वर कोलम पासून दक्षिणेस २५ कि.मी. वर आणि तिरूवनंथपूरम पासून उत्तरेला ४५ कि.मी. वर आहे.

सुंदर वनराईमध्ये वसलेल्या ह्या आश्रमांत नारळासह इतर भरपूर झाडे आहेत. जवळच भात शेती आहे, स्फटिकासारखे स्वच्छ पाणी असणारा बारमाही वाहणारा ओढा अगदी आश्रमाच्या समोरून वाहतो. प्रादेशिक संम्मेलनासाठी या ठिकाणी साधारण १५० अभ्यासी जमतात. महिन्याच्या पहिल्या रविवारी पूर्ण दिवस कार्यक्रम असतो. इथे लहान मुलांसाठी व्हि.बी.एस.सी. चे कार्यक्रम केले जातात. पू. गुरुदेवांनी निर्माण केलेल्या पवित्र वातावरणाचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या सर्व अभ्यासींचे स्वागत आहे.

विभागीय आश्रम, गोरखपूर

दि. २ डिसेंबर २००९ रोजी बंधू उमा शंकर यांच्या हस्ते येथील आश्रमाची पायाभरणी झाली. या कार्यक्रमासाठी गोरखपूरहून आणि जवळच्या इतर केंद्रांमधून साधारण १५० अभ्यासी जमले होते. इथल्या ध्यानकक्षाचे बांधकाम सन २०१०च्या वसंतोत्सवापर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. या आश्रमाची जागा अतिशय सुंदर अशा 'कुष्मी' या हिरव्यागार सागाच्या जंगलासमोर आहे.

या प्रसंगी बोलतांना बंधू उमा शंकर म्हणाले की, आश्रम हे प्रकाशाची केंद्रे असतात, जिथे प्रत्येक व्यक्तिला पू. गुरुदेवांचे अस्तित्व जाणवते. त्यांनी सर्व अभ्यासींनी स्वत:हून अशा कामांसाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले, आणि गुरुदेवांची लोकप्रिय उक्ति– 'सेवा करा आणि सेवा मिळवा' चा पुनरूच्चार केला.

लखनऊ

वाराणसी

चिरक्करा

युवा कार्यक्रम– हुबळी, उ.कर्नाटक

दि. २५–१०–०९ रोजी हुबळी केंद्रात दृक–श्राव्य माध्यमे वापरुन युवा पथदर्शक कार्यक्रम आयोजित केला गेला होता. १५ युवा अभ्यासी आपल्या जवळ जवळ २५ मित्र मैत्रिणींना घेऊन ह्या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

हा कार्यक्रमाची कल्पना पुढील विषयांवर युवकांना अधिक ज्ञान देणे ही होती – नेतृत्व, ऐकण्याची कला, व्यक्तिमत्व विकास, चारित्र्य निर्माण, परस्पर संबंध, आदर्श व्यक्ति, संवाद, आकांक्षा विरुद्ध महत्वाकांक्षा आणि ध्यानाद्वारे मनाचे नियमन.

योग्य त्या ठिकाणी गुरुदेवांच्या भाषणाचे अंशही दाखवले गेले. या कार्यक्रमाद्वारे युवावर्गावर पालकांप्रती, समाजाप्रती आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे स्वत:प्रती असणाऱ्या जबाबदारीची जाणीव बिंबविण्याचा प्रयत्न केला गेला. त्याचप्रमाणे भविष्यात येणाऱ्या आव्हानांसाठी या तरूण वर्गाला तयार करणे हे ही या कार्यक्रमाचे उदिष्ट होते.

प्रशिक्षकांचे प्रशिक्षण

नुकत्याच आयोजित केलेल्या बहुतेक सर्व प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांना गुरुदेवांच्या सहवासाचा लाभ मिळाला. त्यांच्या भाषणांनी आणि सत्संगांनी या कार्यक्रमांना चैतन्य प्राप्त झाले. सहभागींसाठी हा अनुभव अत्यंत प्रेरणादायी आणि जोमदार ठरला.

गुजरात

दि. १० ते १४ डिसेंबर दरम्यान गुजरातमधील सुमारे ७० प्रशिक्षकांचे तिरुप्पूरला आगमन झाले व हा काळ त्यांनी पू. गुरुदेवांसमवेत तिरूप्पूर, कोईम्बतूर आणि मलमपूझा येथील रिट्रीट सेंटर मध्ये व्यतीत केला. पू. गुरुदेवांनी येथे एकत्र जमलेल्या सर्व अभ्यासींना दररोज ३ सिटींग्ज दिल्या. पू. गुरुदेव यावेळी उत्तम अभ्यासीच्या पुढील लक्षणांविषयी बोलले.

- अंतर्मुख होणे.
- दुसऱ्या व्यक्तिला समजून घेण्यासाठी सहनशिलतेने ऐकून घेणे.
- दुसऱ्याला पराभूत करण्यापेक्षा दुसऱ्याकडून शिकण्याची वृत्ती असणे.
- सर्वच बाबतीत सहनशीलता विकसित करणे.

कर्नाटक

दि. ५ डिसेंबर २००९ रोजी बंगलोर क्रेस्ट मध्ये जमलेल्या १४० प्रशिक्षकांशी बोलतांना पू. गुरुदेवांनी कर्नाटकातील सहजमार्ग साधनेतील तृटींवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, भक्तिचा अभाव असून प्रशिक्षकांना इतर नवीन केंद्रांमध्ये जाण्याची आणि संस्थेच्या मुख्य धमनी प्रमाणे काम करण्याची गरज आहे.

आंध्र प्रदेश

दि. २५ ते २७ डिसेंबर या काळात चेन्नई येथील बाबूजी मेमोरियल आश्रमातर्फे आंध्र प्रदेशातील प्रशिक्षकांसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आल होते. राज्यातील राजकीय अस्थिरतेमुळे वाहतुकीच्या अडचणी उद्भवलेल्या असूनही १८० प्रशिक्षक यामध्ये सहभागी झाले होते.

यावेळी प्रशिक्षकाचे कार्य, चारित्र्य, व्हिस्पर्स आणि सहज मार्ग – एक जगण्याचा मार्ग या विषयांवरील भाषणे झाली व यासर्व कार्यक्रमांदरम्यान एकमेकांशी चर्चा व त्यावर प्रतिक्रिया यांची आवर्तने सुरु होती. रविवारी सकाळी साधारण ११ वाजता पू. गुरुदेवांनी जमलेल्या प्रशिक्षकांबरोबर एक तास व्यतीत केला, या दरम्यान त्यांनी सर्वांसाठी संदेश दिला व त्यानंतर ध्यानाचे संचालन केले त्यामुळे सर्वजण आनंदून गेले.

महाराष्ट्र

दि. १३ ते १५ नोव्हेंबर दरम्यान पुणे केंद्राने आयोजित केलेल्या दोन दिवसीय प्रशिक्षक बैठकीला महाराष्ट्रातील सुमारे ५० प्रशिक्षक सहभागी झाले होते. या दोन दिवसांत 'सर्वप्रथम अभ्यासी', 'नियमीत साधनेचे महत्व', 'अभ्यासींना सिटिंग्ज देणे', 'संस्थेचे कार्यक्रम आणि प्रकाशन' अशा विविध विषयांचा समावेश केला गेला. नवीन प्रशिक्षकांना यामुळे प्रेरणा मिळाली आणि निष्ठेनी काम करण्याचा विश्वास घेऊन ते परतले.

खुले चर्चासत्र मुंबई, महाराष्ट्र

रविवार दि. ८ नोव्हेंबर २००९ रोजी अणूशक्तिनगर मुंबई येथील नागरिकांसाठी एस.आर.सी.एम. तर्फे 'होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन' येथे खुल्या चर्चासत्राचा कार्यक्रम आयोजित केला गेला होता. सुमारे १२० जण या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात भगिनी धारेश्वर यांनी एस. आर. सी. एम. व सहजमार्ग साधनापद्धतीद्वारे केल्या जाणाऱ्या ध्यानाबद्दल माहिती देऊन केली. संध्याकाळच्या सत्रातील विषय होता– 'स्वतःला जाणून घेण्याचे शास्त्र– एक नैसर्गिक मार्ग'.

एस.आर.सी.एम. चे संयुक्त चिटणीस बंधू ए. पि. दुराई ह्यांनी अध्यात्मिक आणि व्यावहारिक जिवनांत समतोल आणण्यासाठी ध्यान साधना किती महत्वपूर्ण आहे हे विस्तृतपणे सांगितले.

बंधू भाटिया यांनी मग, ते सहज मार्गात कसे आले आणि त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या आयुष्यात कसा बदल घडून आला हे सांगितले. त्यानंतर एक प्रश्नोत्तरांचे सत्र झाले. श्रोत्यांमधील काही जणांना समजून घ्यायचे होते की त्यांच्या आयुष्यातील वैयक्तिक किंवा स्वास्थ्य विषयक प्रश्नांवर सहज मार्गा कडे काही उपाय आहे का?

शेवटी 'इंन्स्टंट लिबरेशन' हि पू. गुरुदेवांची ध्वनीचित्रफित दाखविण्यात आली. श्रोत्यांवर त्याचा चांगलाच परिणाम झालेला दिसला. त्यातील २२ सहभागींनी प्रारंभिक सिटींग घेऊन ध्यान साधनेस सुरूवात केली.

जयपूर

भोपाळ

इंदोर

अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम

जयपुर केंद्राने दि. २२ नोव्हेंबर २००९ रोजी नवीन अभ्यासींसाठी अर्ध्या दिवसाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यामध्ये साधनेसंबंधीच्या अनेकविध विषयांवर चर्चा व प्रश्नोत्तराची सत्रे होती. यामध्ये सहभागी झालेले सुमारे ३० अभ्यासी "हा कार्यक्रम अतिशय लाभकारक होता आणि एखाद्या नवीन अभ्यासीने संस्थेसंबंधी आणि तिच्या निरनिराळ्या कार्यकलापांविषयी जास्त माहिती मिळविण्यासाठी अशा कार्यक्रमांमध्ये भाग घेतला पाहिजे" अशा धारणेचे होते.

भोपाळ येथे दि. २७ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर पर्यंत एका रहिवाशी अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आश्रमाच्या पवित्र वातावरणामध्ये घेतल्या गेलेल्या या कार्यक्रमामध्ये सुमारे ५० अभ्यासी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या प्रस्तुतीकरणामधून आणि प्रश्नोत्तराच्या सत्रामधून शिक्षकवर्गाने सहभागींच्या साधनेसंबंधीच्या बऱ्याच शंकांचे समाधान केले. वातावरणामध्ये एक प्रकारचा बंधुभाव व समन्वय आढळून आला. कार्यक्रमाअंती साधनेमध्ये नियमितता पाळण्याचा सर्वांनी ठाम निर्णय घेतला.

दि २९ नोव्हेंबर २००९ रोजी रांची केंद्रामध्ये गेल्या एका वर्षामध्ये ज्यांनी या संस्थेमध्ये प्रवेश घेतला आहे अशा सर्वांसाठी पहिलाच अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. बंधू तिवारी यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर बंधू लाल, बंधू तनेजा, बंधू साहू, बंधू मिश्रा आणि भगिनी तिवारी यांनी SMRTI ने तयार केलेल्या ध्वनिचित्रफीतींच्या सहाय्याने या प्रशिक्षण कार्यक्रमातील निरनिराळे भाग सादर केले. गुरुदेवांच्या ध्वनीफीत (Audio) व चित्रफीतीमधील (Video) भाषणांमध्ये साधना व संस्थेच्या विभिन्न अंगांविषयी सविस्तर माहिती असल्यामुळे त्यांचे बरेच कौतुक झाले.

मध्यप्रदेशच्या इंदोर केद्राने दि. ६ डिसेंबर २००९ रोजी अनुभव कथनाचा कार्यक्रम केला. ज्यांनी गुरुदेवांसमवेत नुकताच प्रवास केला आहे व ज्यांनी प्रशिक्षण कार्यक्रमात भाग घेतला आहे अशा अभ्यासींनी सहभागींना आपले अनुभव सांगितले. बेंगलोर येथे CREST मध्ये प्रशिक्षण घेतलेल्या बंधू आपटे यांनी तेथील कार्यक्रमाविषयी सविस्तर माहिती सांगितली आणि सहभागींना अशा कार्यक्रमामध्ये भाग घेण्यास प्रोत्साहित केले. गुरुदेवांबरोबर गंगटोकचा प्रवास करण्याचे भाग्य लाभलेल्या बंधू मुंन्द्रा यांनी त्यांच्या प्रवासाची छायाचित्रे दाखविली व या ठिकाणांना भेट देण्यामध्ये गुरुदेवांनी दाखविलेल्या उत्साहाचे वर्णन केले. गुरुदेवांनी केलेल्या खट्याळ पण अर्थपूर्ण अशा टिप्पणींबद्दलही ते बोलले. खरगपूर येथील CREST मध्ये गुरुदेवांसमवेत असण्याची संधी लाभलेल्या बंधू रावरेकर यांनी गुरुदेवांनी केलेल्या भाषणामधील महत्वपूर्ण मुद्दे सांगितले. हे निरनिराळे अनुभव ऐकताना अभ्यासी एक प्रकारच्या आंतरिक आनंदाने भरुन जात होते असे आढळले.

गुजरात मधील भुज येथे १५ नोव्हेंबर रोजी झालेल्या अर्ध्यादिवसाच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सुमारे २१ अभ्यासींनी भाग घेतला होता. कार्यक्रमामध्ये साधनेसंबंधीच्या बऱ्याच विषयांवर भाषणे होती. सत्संगाची माहिती दर्शविणारी नारदमुनींच्या कथेवर आधारित एक नाटिकादेखील प्रस्तुत केली गेली. या कार्यक्रमामुळे सहभागींचे शंकानिरसन झाले आणि ते माघारी जाताना उत्साही दिसत होते.

दि १४ आणि १५ नोव्हेंबर रोजी वडोदरा केंद्राने दीड दिवसाची युवकांची कार्यशाळा आयोजित केली होती. सुमारे ३५ अभ्यासींनी यामध्ये भाग घेतला होता. पाच भागांमध्ये विभागलेल्या या कार्यक्रमामध्ये सहजमार्ग साधनेविषयी जास्त माहिती, युवकांची या संस्थेमधील भूमिका आणि सर्वांसमवेत बंधुभाव वाढ्ण्याची सत्रे घेतली गेली. सहभागींना ही कार्यशाळा अतिशय उपयोगी आणि शिकवणींनी भरपूर अशी वाटली.

चित्रदुर्ग, करूर, हरिहर आणि भद्रावती येथील सुमारे ७० अभ्यासींसाठी दावणगेरे केंद्राने दि. १५ नोव्हेंबर '०९ रोजी एक कार्यक्रम आयोजिला होता. बंधू आर. रामाणी, बंधू नागेश, भगिनी इंदिरा प्रसाद आणि भगिनी सुजाता हे उपस्थित होते. पहिल्या सत्रामध्ये अभ्यासी चर्चेसाठी ४ गटांमध्ये विभागले गेले. चर्चिलेले मुद्दे प्रत्येक गटाच्या प्रवक्त्याने सर्वांसमोर मांडले. काही अभ्यासींना या गोष्टींमध्ये ज्या शंका होत्या, त्यांची उत्तरे शिक्षक वर्गाने देऊन त्यांचे व्यवस्थित निरसन केले.

दुसऱ्या सत्रामध्ये आपल्या अध्यात्मिक जीवनामध्ये गुरुदेवांची भूमिका कशी महत्वपूर्ण आहे आणि आपल्याला कशाप्रकारे त्यांना सहयोग दिला पाहिजे यासंबंधी बंधू बी.श्रीनिवास यांनी विश्लेषण दिले.

विद्यार्थ्यांनी अभ्यासींची वर्तणूक व प्रवृत्ती दर्शविणारी एक नाटिका प्रस्तुत केली. हा कार्यक्रम प्रत्येक अभ्यासीसाठी उपयोगी होता आणि एक प्रकारचा उल्हास वातावरणामध्ये पसरून होता.

रांची

भूज

दावणगिरी

व्हि.बी.एस.ई. कार्यक्रम

होशंगाबाद

होशंगाबाद केंद्रातील एस.ई.व्ही.ए. शाळेमध्ये एक तास व्हि.बी.एस.ई.च्या अभ्यासक्रमांतर्गत मुल्ये शिकवण्यासाठी राखुन ठेवलेला असतो आणि हे गेल्या २ वर्षापासून नियमीतपणे सुरु आहे. यावर्षी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या नियोजनाच्यावेळी शाळा व्यवस्थापनाने मुल्यांवर अधिक लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले व त्यासाठी आपल्या व्हि.बी.एस.ई. च्या समन्वयकांची मदत मागीतली. स्वयंसेवकांनी 'आनंद' या मूल्यावर भर देण्याचे ठरविले व या चमूने विद्यार्थ्यांसमवेत एका छोटी नाटिका, गाणी व नाचाद्वारे या मुल्यांच्या विविध पैलुंची ओळख करुन दिली. या सत्रासाठी पालकवर्ग सुद्धा हजर होता आणि अशाप्रकारे हा संदेश एका मोठ्या जनसमुदायापर्यंत पोहोचला.

ही शाळा पालकांना मुल्याधारित शिक्षणाद्वारे आपल्याकडे आकर्षित करीत आहे व याप्रकारे आपल्या प्रिय गुरुदेवांची सेवा करीत आहे.

ऊर्सुलाईन कॉन्व्हेंट रांची

दि. ५ नोव्हेंबर २००९ रोजी सुमारे ९०० विद्यार्थी एक तासाच्या सत्रामध्ये सहभागी झाले होते. या सत्रामध्ये वेळेचे मुल्य, वेळेचे व्यवस्थापन, मानवी जिवनाचे उद्दिष्ट या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मिशनची प्रार्थना मुलांना सांगण्यात आली.

मुलांना काम करण्यास व केल्यानंतर ते विसरुन जाण्यास सांगण्यात आले जेणेकरुन त्यांच्या मनावर त्याचे संस्कार निर्माण होऊ नयेत. प्रयोग आणि स्पष्टीकरणाद्वारे समजावून सांगण्यात आले की आपण कश्याप्रकारे चांगल्या किंवा वाईट सवयी लाऊन घेतो व मग त्या सवयींचे गुलाम होतो.

बंधू अरुण कुमार यांनी आपला वेळ व काम ४-डी पद्धतीच्या सहाय्याने अधिक चांगल्याप्रकारे कश्याप्रकारे नियोजन करावे हे समजावून सांगीतले. त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या कामांचे वर्गीकरण वेगवेगळ्या प्रकारे करण्याचा सल्ला दिला. प्रथम अशी कामे जी दुसऱ्यांना देता येतील, त्यानंतर अशी कामे जी नंतर केली जाऊ शकतील, त्यानंतर अशी जी गाळता येतील व त्यानंतर राहिलेली जी करणे आवश्यकच आहे, जी आत्ताच केली पाहिजेत कुठल्याही विलंबाशिवाय. समारोप सत्रात विद्यार्थी व शाळा व्यवस्थापन यांनी विचारलेले प्रश्न, त्यांना कार्यक्रम आवडला याची पावती देत होते.

फरक्का, पश्चिम बंगाल

डी.पी.एस. फरक्काचे मुख्याध्यापक बंधू सुब्रमण्यम कुमार व बंधू विजय कुमार यांनी व्हि.बी.एस.ई. कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दोन दिवसांमध्ये हा कार्यक्रम विभागला गेला होता. दि. ११ डिसेंबर रोजी पहिले सत्र इ. ६ वी ते ८ वी च्या सुमारे ३०० मुलांसाठी होते तर दुसऱ्या सत्रामध्ये इ. ९ वी ते ११ वी चे सुमारे २०० मुले होती. दि. १२ रोजी शिक्षकांसाठी एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये ५७ शिक्षकांसह इतर शाळांचे ३ मुख्याध्यापक सहभागी झाले होते.

विविध प्रयोगांद्वारे व कथांद्वारे विद्यार्थ्यांना मुल्यांचा परिचय करुन देण्यात आला. दोन्ही वर्गातील मुलांद्वारे व शिक्षकांद्वारे हे प्रयोग अतिशय उत्तमरित्या समजून घेतले गेले व स्विकारले गेले. शेवटी सर्व मुलांना अशी कल्पना करण्यास सांगण्यात आले की ते शिक्षक आहेत आणि त्यांना त्यांच्या विद्यार्थ्यांकडून असलेल्या अपेक्षा लिहण्यास सांगण्यात आले तसेच विद्यार्थी म्हणून त्यांच्या शिक्षकांकडून असलेल्या अपेक्षा लिहिण्यास सांगण्यात आल्या.

दुसऱ्या दिवशी शिक्षकांसाठी आयोजित कार्यक्रमात हा प्रतिसाद त्यांच्यापर्यंत परिणामकारकरित्या पोहोचवण्यात आला. यावेळी शिक्षकांना पूढील मुद्द्यांवर मनन करण्यास सांगण्यात आले – आपण खरोखरच मुलांमध्ये असलेल्या खजिन्यास प्रकट करण्यासाठी प्रयत्न करित आहोत की फक्त आपल्याला मिळणाऱ्या पगाराविषयी विचार करित आहोत तसेच असे का आहे की आपल्यास शिकवणारे सगळे शिक्षक नव्हे तर केवळ काही शिक्षक आपणांस लक्षात रहातात तसेच आपण विद्यार्थ्यांसमोर स्वत: एक ऊदाहरण म्हणून प्रस्तूत करित आहोत का?

सर्व शिक्षक या कार्यक्रमाने अतिशय प्रभावित झाले व असे कार्यक्रम पुन्हा पुन्हा करणे, यांमध्ये ध्यानाचा समावेश करणे अशाप्रकारच्या सुचना समोर आल्या.

हुबळी

दि. १० नोव्हेंबर रोजी स. १० ते संध्या. ५ यादरम्यान हुबळी केंद्राने एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बंगलोर येथील भगीनी माधुरी व भगीनी सरोजा यांनी सुमारे ४१ शिक्षक व १५ अभ्यासींसाठी या कार्यक्रमाचे संचालन केले.

भगीनी माधुरी यांनी मुल्ये म्हणजे काय हे समजावून सांगीतले तर बंधू अजीत कामथ यांनी मुल्यांची गरज का आहे हे समजावून सांगीतले. भगीनी सरोजा यांनी वयानुसार बदलणारी आकलनशक्तीबाबत सांगीतले त्याचबरोबर वयवर्ष ४ ते ७ वयोगटातील मुले आपल्या शिक्षकांचे अनुकरण करण्यास कसे सक्षम असतात व त्यानंतर त्यांच्यामध्ये मुल्यमापन करण्याची प्रवृत्ती कशी विकसीत होते हे सांगीतले. शिक्षक व मुले हे वर्गात प्रवेश करतांना तीन व्यक्तिमत्वांसह प्रवेश करतांत – शारिरीक, मानसिक व भावनीक. लहान मुले आपल्या शिक्षकांची मनस्थिती पटकन ओळखतात अगदी मोठ्या माणसांपेक्षाही लवकर. यावेळी हृदय खुले करणे व सहकार्य देणे व स्विकारणे हे शिकविणारे काही खेळ खेळले गेले. यावेळी एका समूह चर्चेचे आयोजन करण्यात आले यामध्ये शिक्षकांना क्लिप, आरसा, पेन यांसारख्या साध्या वस्तू देण्यात आल्या व त्यांपासून मुल्ये ओळखण्यास सांगण्यात आले. शिक्षकांना आपले विषय जसे इतिहास, भुगोल हे मुल्यांशी जोडून शिकवण्यास सांगीतले गेले. हे सत्र अतिशय रंगले ज्यामध्ये शिक्षकांनी समरसून भाग घेतला.

अनुभवांची देवाण–घेवाण, बंगलोर

दि. २० डिसेंबर २००९ रोजी परमधाम आश्रम येथे सत्संगानंतर एका विस्तारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुदेवांच्या नुकत्याच झालेल्या भेटीच्या अनुषंगाने अनुभवांची देवाण–घेवाण करणे आणि त्यातून शिकणे हा यामागील उद्देश होता. या सत्रातून निर्माण झालेले काही विचार खालीलप्रमाणे आहेत.

- गुरुदेवांचे कार्य ह्रदयाने ह्रदयावर केलेले कार्य असते. प्रत्येक ह्रदय कोणत्या परिस्थितीतून जात आहे याची त्यांना जाण असते, त्यामुळे ह्रदयाच्या दु:खांबद्दल व वेदनांबद्दल त्यांना सहानुभूती वाटते. ह्रदयाला त्यांच्याकरिता खुले ठेवणे हे आपले काम आहे.
- गुरुदेवांच्या मते दोषरहित चारित्र्य म्हणजे "जसे बाहेर तसे आत". गुरुदेवांच्या अनुकरणाने हे अमलात आणता येईल.
- गुरुदेवांची प्रत्येक भेट ही सोशिकपणा अंगी बाणवण्याची आणि अपेक्षापूर्वक वाट कशी बघावी ही कला शिकण्याची एक सुसंधी असते. गुरुदेवांची प्रत्येक भेट ही "वेगवेगळ्या पातळीवर वाट कशी बघावी" या प्रशिक्षणाची संधी असते.
- कुठल्याही केंद्राला गुरुदेवांनी दिलेली भेट ही आध्यात्मिक प्रगतीकरिता उत्कृष्ट संधी असते. योग्य पूर्वतयारी असेल तर आपण या संधीचे सोने करू शकतो.

काही अनुभव हे शब्दातीत असतात. ते आपल्या ह्रदयाच्या गाभाऱ्यात जतन करून ठेवायचे असतात आणि गुरुदेवांप्रति प्रेम व कृतज्ञता या स्वरूपात व्यक्त करायचे असतात.

वर्धापनदिन समारंभ, कलकत्ता आश्रम

कलकत्ता आश्रमाच्या सहाव्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक २५ डिसेंबर रोजी लहान मुलांकरिता व अभ्यासींकरिता एका खेळाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भगिनी जैन व भगिनी कोठारी यांनी आयोजित केलेल्या या स्पर्धांमध्ये निरनिराळ्या वयाच्या सुमारे १०० व्यक्तींनी भाग घेतला.

तीन वर्षांखालील मुलांसाठी 'आलिंगन स्पर्धेचे' आयोजन केले होते, ज्यामध्ये सहभागी झालेल्यांनी आपल्या पालकांना धावत जाऊन मिठी मारायची होती. एका बशीत ठेवलेली डाळ व राजमा एकमेकांपासून वेगळे करण्याचा खेळ मोठ्या मुलांकरिता होता. या कार्यक्रमाचे वेगळेपण असे होते की आश्रमात येण्याकरिता अभ्यासींना मुलांनी प्रोत्साहित केले होते.

आत्मशोध आणि सखोल मनन, इंदोर

दि. १८ ते २२ डिसेंबर असे पाच दिवस आठ अभ्यासी आश्रमाच्या शांत व प्रसन्न वातवरणात राहिले. आत्मशोध घेणे व खऱ्या अर्थाने गुरुदेवांच्या समीप जाणे हा या सत्रामागील उद्देश होता.

या कार्यक्रमात कुठल्याही भाषणाचा वा संभाषणाचा समावेश नव्हता कारण स्वत:च्या साधनेचा मागोवा घेणे, आत्मनिरीक्षण करणे , डायरी लिहिणे , पुस्तकांचे वाचन व ध्यान यांचा या कार्यक्रमात अंतर्भाव होता.

बंधू एन. व्हि. देशपांडे यांनी काही उत्तेजनपर गोष्टी संगितल्या. सहभागी अभ्यासींना वैयक्तिक सिटींग घेता यावीत म्हणून रोज सकाळ व संध्याकाळ एक प्रशिक्षक आश्रमात येत होते.

यामुळे अभ्यासींचा उत्साह वाढला, अंतर्गत शांतता जाणवली व ध्येय गाठण्याच्या नव्या निश्चयाने ते रोजच्या आयुष्यात परतले. बंधू अविनाश करमरकर व राजेश रावेरकर यांनी या कार्यकमाचे आयोजन केले होते.

विभागीय पातळीवर असे सत्र आयोजित करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

महाराष्ट्र युवा संम्मेलन (युथ कन्व्हेन्शन) पुणे

दि. १८ ते २० डिसेंबर २००९ च्या दरम्यान पुण्यात झालेल्या या कार्यक्रमात ४७ तरूण सहभागी झाले होते.

यावेळी औपचारिक चर्चांबरोबरच वैयक्तिक साधनेवरही लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. बंधू वैद्य यांनी उपस्थितांचे स्वागत करून सर्वांना शिक्षकांची ओळख करून दिली.उपस्थितांना आठ संघात विभागले गेले व प्रत्येक संघाला स्वत:ची ओळख करुन देताना राज–योगाच्या एका पायरीबद्दल बोलण्यास सांगण्यात आले.

पहिल्या दिवसाच्या सत्रात खालील विषय अंतर्भूत होते : सहज मार्ग पद्धतीने आत्म–विकास, रोजची साधना, प्रेम, करुणा आणि दया, श्रद्धा आणि अभ्यासातून आत्म–शक्ती, महात्त्वाकांक्षा व आकांक्षा, चारित्र्य आणि बदल व मानसिक ताणाचे व्यवस्थापन.

दुसऱ्या दिवशीचे विषय होते आयुष्यातील समतोलाची कला, समाजाप्रति आपले कर्तव्य, गुरुदेवांशी जोडलेले नाते आणि परिणामकारक परस्पर संवाद. या कार्यक्रमाचा शेवट ही काही उपस्थित तरूणांकरिता नवी सुरुवात होती.

प्रकाशाची केंद्रे

अलाहाबाद आश्रम

सन १९६५ रोजी अलाहाबाद केंद्र औपचारिकरित्या सुरु करण्यात आले व श्री. एम. एल. चतुर्वेदी यांना प्रशिक्षक प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले. सन १९९४ पर्यंत त्यांच्या निवासस्थानातूनच या केंद्राचे कामकाज चालू होते व रविवार सत्संग देखील याच ठिकाणी होत होते.

स्थानिक अभ्यासींनी स्थानिक पातळीवर पैसा ऊभा करुन मुंदेरा, अलाहाबाद येथे सुमारे १३ एकर जमीन खरेदी केली. यापैकी ४ एकर जमीन मिशनला दान करण्यात आली. या दस्तावेजांचे नोंदणीकरण १३ एप्रिल १९९४ रोजी करण्यात आले व पू. गुरुदेवांच्या आशिर्वादाने रविवार दि. १३ नोव्हेंबर १९९४ रोजी याठिकाणी प्रथमच रविवार सत्संगाचे आयोजन करण्यात आले.

श्री. आर. आर. के. त्रिवेदी यांच्या अथक प्रयत्नांचे फलित म्हणून उत्तर प्रदेशचे तत्कालीन मा. राज्यपाल श्री मोतीलाल व्होरा यांनी ध्यान कक्षाच्या उभारणीसाठी दि. २७ फेब्रुवारी १९९६ रोजी १० लाख रुपयांचे अनुदान मंजूर केले. दि. ९ मार्च १९९६ रोजी, पू. गुरुदेवांच्या उपस्थितीत मा. राज्यपालांच्या हस्ते पायाभरणी समारोह पार पडला. यावेळी आपल्या भाषणामध्ये पू. गुरुदेवांनी सांगीतले कि हिमालयामध्ये ऋषी कश्याप्रकारे रहात असत व कश्याप्रकारे तपस्या करित असत ज्यायोगे दैवी संप्रेषणाद्वारे सुचना लोकांच्या ह्रदयापर्यंत पोहोचवल्या जात असत. पू. गुरुदेव म्हणाले की श्री. व्होरा देखील दैवी योजनेनुसार काम करित आहेत. त्यांनी विनंती केली की जे लोक प्रभावक्षम पदांवर आहेत त्यांनी त्याचा वापर जनसामान्यांच्या सामाजिक उत्कर्षासाठीच नव्हे तर अध्यात्मिक उन्नतीसाठी देखील केला पाहिजे. यानंतर ध्यानकक्षाच्या उभारणीसाठी आणखी तीन अनुदानं मंजूर करण्यात आली.

दि. १४ नोव्हेंबर १९९७ रोजी पू. गुरुदेवांनी ध्यानकक्षाचे उद्घाटन केले. हा कक्षाचा तळमजला सुमारे १०,००० वर्गफूट असुन त्याला प्रत्येकी २००० वर्गफूटांचे दोन सज्जे आहेत. पू. गुरुदेव आपल्या भाषणात म्हणाले की या केंद्रासाठी आश्रम होणार यामध्ये काहीच संशय नव्हता. बांधकामाच्या वेगाविषयी अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आणि हे निसंशय सर्वजणांनी ह्रदयापासून काम केल्यानेच शक्य झाले. ते म्हणाले की मिशनमध्ये असणारे तरुण हे मिशनचे सैन्य आहे, आपली शक्ति आहे आणि त्यांच्याकडे एकाप्रकारचा ऊत्साह आहे जो वयस्कर लोकामध्ये दिसत नाही.

बंधू यु. एस. बाजपेई यांच्या अथक प्रयत्नांमूळे ऊत्तर प्रदेश सरकारने पू. गुरुदेवांचा कक्ष, ग्रंथालय, वाचनालय, स्वयंपाकघर, जेवणघर, आरामकक्ष, प्रसाधन गृह व रस्ते बांधण्यासाठी पुढील आर्थिक अनुदाने मंजूर केली. याप्रकारे अलाहाबाद आश्रमाच्या उभारणीसाठी सरकारकडून मिळालेल्या अनुदानाची रक्कम सुमारे ८० लाखांपेक्षा जास्त होती. देशातील हा पहिलाच आश्रम आहे ज्याच्या उभारणीसाठी सरकारकडून लक्षणीय आर्थिक अनुदान मिळाले. पू. गुरुदेवांच्या कक्षाजवळ वेगवेगळी फळे व फुलझाडे असलेले उद्यान आहे.

आश्रमामध्ये अत्याधुनिक वैद्यकीय मदतकेंद्र आहे ज्याद्वारे आसपासच्या प्रदेशातील गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा पूरविली जाते.

दर रविवारी सुमारे ४०० अभ्यासी सत्संगासाठी उपस्थित असतात. दररोज सकाळी व संध्याकाळीसुद्धा सत्संगाचे आयोजन केले जाते. आश्रमामध्ये विविध प्रशिक्षण कार्यक्रम देखिल सतत आयोजित केले जात असतात.

To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org
© 2009 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.